Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 646
दिनांक :- 29 MAY 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- उच्च माध्य. (इ.12वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, इतर साहित्य आणि मार्च 2025 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे वितरणाबाबत...**

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2024 करिता प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख आणि मार्च 2025 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे या पत्रासोबत हस्तपोहोच देण्यात येत आहेत.

1. **प्रथमत: आपणास प्राप्त झालेल्या सर्व गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्र आणि योग्यता प्रमाणपत्रे आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र किंवा योग्यता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र किंवा योग्यता प्रमाणपत्रे प्राप्त न झालेस मंडळ कार्यालयास दि.06/06/2024 अखेर लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर प्राप्त तक्रारींचा विचार केला जाणार नाही.**
2. सर्व गुणपत्रिकांवर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर गुणपत्रिकांवरील नोंदी उदा.विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ. माहिती कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका वितरीत करण्यात यावी.
3. गुणपत्रिकांमध्ये काही त्रूटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.02/07/2024 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत-

अ) प्रती गुणपत्रिकेतील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन गुणपत्रिकेसाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.

ब) कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत

क) दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित प्राचार्य व लिपिक यांचा मा.विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

4. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत गुणपत्रिका दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.
5. **उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु.-मार्च 2024 करिता श्रेणी सुधार योजने अंतर्गत (Class Improvement) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.02/07/2024 अखेर विकल्प देणे अनिवार्य राहिल. तसेच दि.02/12/2024 अखेर जादा शुल्क आकारुन विकल्प स्विकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास फेब्रुवारी-मार्च 2024 परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल. विकल्पाचा नमुना फॉर्म या परिपत्रकासोबत जोडला आहे.**

**उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु.-मार्च 2024 करिता श्रेणी सुधार योजने अंतर्गत (Class Improvement) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारस पत्रासह विकल्प फॉर्म आणि पूर्वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका मंडळ कार्यालयास सादर केल्यानंतरच फेब्रु.-मार्च 2024 करिता श्रेणी सुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ मूळ गुणपत्रिका हस्तपोहोच देण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

## ※※ श्रेणीसुधार योजना ※※

### विकल्प फॉर्म

मी.................................................. मार्च/ जुलै-ऑगस्ट च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार योजनेतंर्गत ................................................. या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालो आहे. माझी नविन संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक..................................

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| १) | .............................. | .............................. |
| २) | .............................. | .............................. |
| ३) | .............................. | .............................. |
| ४) | .............................. | .............................. |
| ५) | .............................. | .............................. |
| ६) | .............................. | .............................. |
| | एकूण गुण.................. | |
| | टक्केवारी ..................... | |

मी यापूर्वी मार्च/जुलै-ऑगस्ट च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा.................................. या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालो आहे. त्या परीक्षेची संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक..........................

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| १) | .............................. | .............................. |
| २) | .............................. | .............................. |
| ३) | .............................. | .............................. |
| ४) | .............................. | .............................. |
| ५) | .............................. | .............................. |
| ६) | .............................. | .............................. |
| | एकूण गुण..................... | |
| | टक्केवारी ...................... | |

वरील दोन्ही परीक्षांचा तुलनात्मक विचार करता मी..................................................... असे लिहून देतो की, माझे मार्च/ जुलै-ऑगस्ट च्या माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक ...................... अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी अधिक असल्याने त्या परीक्षेचा निकाल स्वखुशीने स्विकारण्यास तयार आहे.

तसेच मार्च/जुलै-ऑगस्ट च्या माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक.................. अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी कमी असल्याने परीक्षेची संपादणुक रद्द करण्यास माझी संमती आहे.

श्रेणीसुधार योजनेतंर्गत माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस नियमानुसार एकदा प्रविष्ठ होऊन या योजनेचा एकदा लाभ घेतला असल्याने पुनःश्च उपरोक्त परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची मला जाणीव आहे.

※ सदरचा विकल्प फॉर्म सात(७)दिवसाच्या आत भरून देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांचे नांव:-
स्वाक्षरी:-

मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/क.म. चा शिक्का.